# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/डीबीटी-२०१८-१९/२०१९/2762 दिनांक : ०४.०७.२०१९

**महत्वाची सूचना (कालमर्यादा ०९.०७.२०१९):**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, पुणे विभागीय कार्यालयाच्या
अखत्यारीतील सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित /
खाजगी विना अनुदानित संस्था..

**विषय :** **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी संस्थास्तरावर तपासणीसाठी प्रलंबित असलेल्या अर्जांच्या तपासणीसाठी दिलेल्या मुदतवाढीबाबत..**

**संदर्भ :** **१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/२८० दि. ११.०६.२०१९**
**२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०१८-१९/३१४ दि. ०१.०७.२०१९**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांकरीता, विद्यार्थ्यांनी भरलेल्या परंतु संस्था व विभागीय / डिपार्टमेंट स्तरांवर या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या संस्थांमधील तपासणीसाठी प्रलंबित असलेल्या योजनांच्या अर्जांच्या तपासणीची मुदत संदर्भ क्रमांक २ अन्वये ३०.०६.२०१९ इतकी देण्यात आलेली होती. तरीदेखील संस्थास्तरांवरील अर्ज तपासणीकरिता प्रलंबित असल्यामुळे, **प्रलंबित अर्जांची तपासणी पूर्ण करण्याकरिता दिनांक ०९.०७.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.**

सर्व संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या लॉगीन आयडीमध्ये प्रलंबित अर्जांची तपासणी विहीत मुदतीच्या आत पूर्ण करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावेत. तसेच, संस्थास्तरावरील तपासणीसाठीच्या **अंतिम दिनांकानंतर प्रलंबित राहिलेल्या अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील याची नोंद संस्थाप्रमुखांनी घ्यावी.**

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

D:\Yogesh Kelkar\MAHADBT_2018-19\Circular of extension of date.docx